पुढारी पा. नं. ५

# वसईत घडला पोहण्याचा जागतिक विक्रम

## गेट वे ते गोवा परतीच्या ११०५ किमी सागरी प्रवासाची नोंद

वसई : पुढारी वृत्तसेवा

वसई तालुक्यासह इतरत्र भागांतील सहा जलतरणपटूंनी गेट ऑफ इंडिया ते गोवा व पुन्हा गोवा ते वसई असा जलतरणातील जागतिक विक्रमाची नोंद गुरुवारी दुपारी १.४५ मिनिटांनी वसईच्या समुद्र किनारी नोंदवली आहे.

या सहा जलतरणपटूंचे स्वागत नालासोपाराचे आमदार तथा खेलो इंडिया खेलोचे महाराष्ट्र अध्यक्ष क्षितिज ठाकूर, माजी महापौर नारायण मानकर, कला क्रीडा महोत्सवाचे प्रकाश वनमाळी, वसई तालुका शिवसेना उध्दव ठाकरे गट राजाराम बाबर, नवघर माणिकपूर शहर प्रमुख संजय गुरव, शशी भुषण शर्मा, वसई पोलीस निरीक्षक कल्याणराव कर्पे यांनी त्यांचे स्वागत केले

या मोहिमेत उतरलेल्या कार्तिक संजय गुगले (२०), राकेश रवींद्र कदम (२४), संपन रमेश शेलार (२१), जिया राव (१४), दुर्वेन विजय नाईक (१७), राज संतोष पाटील (१७) यांचा समावेश आहे. या सहा जलतरणपटूंनी गेटवे ऑफ इंडिया (मुंबई) ते डोना पॉला (गोवा) आणि परत वसई किल्ल्यापर्यंत रिले पद्धतीने पोहून एकूण ११०५ किमी आणि ४५० मी अंतर ११ दिवस २२ तास आणि १३ मिनिटे ४ सेकदांनी पूर्ण करत आतापर्यंत विश्वातला कॅलिफोर्निया येथील २०१९ मध्ये ९५९ किमीच्या समुद्र अंतराचा विक्रम मोडीत काढला आहे.



### या सहा जलतरणपटूंचा होणार जाहीर सत्कार

या मोहिमेत मुंबईतील गेट ऑफ इंडिया येथून दि १७ डिसेंबर रोजी संध्याकाळी सुरुवात झाली आणि गुरुवार दि २९ डिसेंबर ला दुपारी १.४५ मिनीटांनी त्याचा समारोप झाला. या संपूर्ण मोहिमेसाठी ऑल इंडिया पेरा स्विमिंग असोसिएशनचे सुबोध सुळे आणि ओपन वॉटर स्विमिंग असोसिएशनचे सुनील पाटील हे या सर्व मोहिमे त निरीक्षक म्हणून सोबत होते. ही मोहीम पूर्ण केल्या बद्दल जगतिक विक्रम केल्याबद्दल खेलो इंडिया खेलोचे महाराष्ट्र अध्यक्ष तथा आमदार क्षितिज ठाकूर यांनी या सहा जलतरणपटूचे कौतुक केलं आहे. जागतिक विक्रम करणाऱ्या या सहा जलतरणपटूंचा उद्या शुक्रवार दि ३० डिसेंबर रोजी जाहीर सत्कार करण्यात येणार आहे.

पुढारी पा. नं. ८

# ट्रॅफिक मार्शलवर जीवघेणा हल्ला करणाऱ्यांना अटक

भाईंदर : पुढारी वृत्तसेवा

ट्रॅफिक मार्शलवर जीवघेणा हल्ला केल्या प्रकरणी आरोपी हरीओम लालमन थिवर (२०), मौन राजेन्द्रप्रसाद आंबेडकर (१८), निखिल रामसजन गुप्ता (१९), कृष्णा विरेन्द्र कनोजिया (२०), अमित मंगलप्रसाद सोनी (१९) व अखिलेश अजय यादव (१९) यांना अटक करण्यात आली तर दोन अल्पवयीन मुलांना पोलिसांनी ताब्यात घेतले. या गुन्ह्यात हल्ला करण्यासाठी वापरण्यात आलेले हत्यार हस्तगत करण्यात आले आहे.

कांदिवली येथील शताब्दी हॉस्पीटल येथून नवघर पोलीस ठाणे येथे २४ डिसेंबर रोजी मीरारोड येथील जयकुमार कंस्ट्रक्शन कंपनीत ट्रॅफिक मार्शलचे काम करणारे जावेद नियाज अहमद खान (२७) व त्याचा मित्र इसम जाफर जावेद खान (२६) यांना तेथील दिपक हॉस्पिटलजवळ ७ ते ८ अनोळखी इसमांनी पहाटे ४ वाजताच्या सुमारास मारहाण केल्याची माहिती देण्यात आली. हे ट्रॅफिक मार्शल छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील मॅक्डोनल्ड येथे कर्तव्य बजावित असताना काही अनोळखी व्यक्तींनी त्यांना शिवीगाळ करून मारहाण केली, तर जावेद यांचे दुसरे मित्र व जाफर यांच्या छातीवर धारदार शस्त्राने वार करीत त्यांच्या पोटामध्ये चाकु भोकसुन तीन वार केले. याप्रकरणी जावेद याने नवघर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला होता.

CS CamScanner

पुढारी पा.न. ३

# पाकिस्तानी एनेमी प्रॉपर्टीवर बांधकाम परवानगी देऊ नये

## बांधकाम सुरु असल्यास ते तात्काळ थांबविण्याची पालिकेला अप्पर तहसीलदारांची सूचना

**भाईंदर : राजू काळे**

मिरा-भाईंदर महापालिका हद्दीतील मौजे काशी, मौजे महाजनवाडी व मौजे घोडबंदर येथील ३ हेक्टर (७ एकर २० गुंठे) जागेत कोणतेही बांधकाम करण्यास परवानगी देऊ नये. तसेच बांधकाम सुरु असल्यास ते तात्काळ थांबविण्याची सूचना अप्पर तहसीलदार नंदकिशोर देशमुख यांनी पालिकेला केंद्रीय एनेमी प्रॉपर्टी विभागाच्या निर्देशानुसार १० जानेवारी २०२२ रोजीच्या पत्राद्वारे दिली. तर पालिकेने दिलेल्या बांधकाम परवानगी प्रकरणी नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांकडे पत्रव्यवहार करून मार्गदर्शन करण्याची विनंती केली. यावर शासनाची कार्यवाही प्रलंबित असतानाही त्या जागेवर बांधकाम सुरु झाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

शत्रू राष्ट्रातील एखाद्या नागरीकाची जमीन भारतात असेल तर ती केंद्र सरकारकडे एनेमी प्रॉपर्टी (शत्रू मालमत्ता) म्हणून जमा असली तरी शत्रू राष्ट्राखेरीज इतर राष्ट्रातील नागरीकाची जमीन भारतात असल्यास तिचा व्यवहार परस्पर करता येत असल्याचे कायदेतज्ञांकडून सांगण्यात आले. मात्र शत्रू राष्ट्रातील नागरीकाची भारतातील जमिनीचा केंद्र शासनाच्या १९६८ मधील कायद्यान्वये केंद्रीय एनेमी प्रॉपर्टी विभागाच्या परवानगीखेरीज कोणताही व्यवहार करता येत नाही. मात्र मिरा-भाईंदरमधील पाकिस्तानी नागरीकाची एनेमी प्रॉपर्टी परस्पर विकल्याचा प्रकार घडल्याचे निदर्शनास आले आहे.



शहरातील काशी गावात राहणारे मोईनुद्दीन निजामुद्दीन पटेल व त्यांचे भाऊ हुसेनिया निमामुद्दीन शेख यांचे कुटुंब १९४७ मधील भारताच्या फाळणीनंतर पाकिस्तानात गेले. त्यांची मौजे काशी येथील सर्व्हे क्रमांक ६ पै २, ६ अ, ७, ५पै ७, ९, १०, १८ पै ६, २१ पै १, २२पै५, १४पै६, १पै२, १९पै९, ३पै३ व १अ, मौजे घोडबंदर येथील सर्व्हे क्रमांक १०६, ११पै६, ७, ८, १२पै९अ, १०९पै५ व मौजे महाजनवाडी येथील सर्व्हे क्रमांक २०(९५)पै१०, ११, १२, १४, १५, २१(९७)पै३, ४, ५, २४(९४)पै५अ, ५ब, ७, ८अ, ब, क, ९, १०अ, ब, क, ११, १३, २५(१००)पै२अ, ब, क, ४अ, ब, क, २२(१८८)पै१, २ व ३ वरील ३ हेक्टर (७एकर २० गुंठे) जमीन केंद्रीय गृह विभागांतर्गत एनेमी प्रॉपर्टी म्हणून जमा करण्यात आली. जमिनीचे मालक मोईनुद्दीन यांचे पाकिस्तामधील कराचीमध्ये ६ सप्टेंबर १९७१ रोजी निधन झाले. त्यामुळे त्यांचा वारसदार ठरलेला त्यांचा मुलगा मोहम्मद इम्रान मोईनुद्दीन पटेल याच्या नावे ९ जुलै २००७ रोजी पॉवर ऑफ ऍटर्नी नोंदणीकृत करून देण्यात आली.

या जमिनीच्या व्यवहारासाठी इम्रान २००७ मध्ये भारतात आला. त्याने केंद्र सरकारच्या एनेमी प्रॉपर्टी विभागाला अंधारात ठेवून मोईनुद्दीन यांची जमीन आसीफ पटेल, रिझवान पटेल, नूर मोहम्मद पटेल, सिकंदर पटेल यांच्याशी संगनमत करून मेसर्स ए. ए. कॉर्प या स्थानिक कंपनीला परस्पर विकली. ७ सप्टेंबर २००७ रोजी त्याचा करारनामा ठाणे येथील उपनिबंधक २ कार्यालयात नोंदणीकृत करण्यात आला.

CamScanner

सामना पा.न.१

मुख्यमंत्री शिंदे यांचा आणखी एक जमीन घोटाळा

# मीरा-भाईंदरमध्ये एकशे दोन कोटींचा महसूल बुडवणाऱ्या विकासकांना बांधकाम परवानगी

**बोगस यूएलसी प्रमाणपत्रे, बिल्डर-अधिकाऱ्यांना अटक आणि प्रकरण न्यायप्रविष्ट; शपथ घेताच एका महिन्यात आदेशावर स्वाक्षरी**

भाईंदर, दि. २९ (सा.वा.) – नागपुरातील एनआयटी जमीन घोटाळा उघड झाल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली असतानाच आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा आणखी एक जमीन घोटाळा उघडकीस आला आहे. मीरा-भाईंदरमध्ये १०२ कोटींचा महसूल बुडवणाऱ्या विकासकांना बांधकाम परवानगी दिली असून मुख्यमंत्रीपदाची शपथ घेताच एकनाथ शिंदे यांनी तत्परता दाखवत या प्रकरणावर स्वाक्षरी ठोकली. आमचे सरकार सर्वसामान्यांचे आणि गोरगरीबांचे असल्याचा डांगोरा पिटणाऱ्या मुख्यमंत्र्यांनी मीरा-भाईंदरमधील बिल्डरांसाठी मात्र 'ओक्के' काम केले. धक्कादायक म्हणजे या बिल्डरांनी बोगस यूएलसी



बोगस यूएलसीच्या याच प्रस्तावावर मुख्यमंत्र्यांनी सही केली.

प्रमाणपत्रे मिळवली असून त्यांच्यासह अधिकाऱ्यांनादेखील यापूर्वीच अटक झाली आहे. संपूर्ण प्रकरण न्यायप्रविष्ट असतानाही मुख्यमंत्र्यांनी ▮ पान ८



**प्रकरण काय?**

*मीरा-भाईंदरमधील श्यामसुंदर अग्रवाल, शैलेश शहा, मनोज पुरोहित, रतीलाल जैन यांसह काही विकासकांनी मॅक्सेस मॉल या उच्चभ्रू वस्तीतील भागात जमिनी खरेदी केल्या. या जमिनी आर झोनमध्ये (रहिवासी) असतानाही त्या ग्रीन झोनमध्ये दाखवण्याचा खटाटोप या विकासकांनी केला. त्यासाठी सरकारी अधिकाऱ्यांना हाताशी धरून १७ बोगस यूएलसी प्रमाणपत्रे तयार केली.*

लोकमत पु.पा.न.१

# मीरा-भाईंदरमधील रिक्षाचालकांकडून लूट

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा-भाईंदरमधील अनेक रिक्षाचालक मनमानी प्रवासी भाडेवसुली करतानाच तीनऐवजी बेकायदा चार ते पाच प्रवासी बसवून प्रवाशांची लूट करत आहेत. याशिवाय त्यांच्या जीवाशी खेळत आहेत. मात्र प्रादेशिक परिवहन विभाग व वाहतूक पोलिसांकडून ठोस कारवाई होताना दिसत नाही.

भाईंदर पश्चिमेच्या रिक्षाचालकांनी नुकतीच परस्पर भाडेवाढ केली, तर भाईंदर पूर्वेला आजही अनेक रिक्षाचालक कोरोनाकाळातील धोरणात ठरलेले १५ रुपये प्रति प्रवासी भाडे बळजबरी घेत आहेत. वास्तविक, त्यावेळी केवळ दोन प्रवासी बसविण्याचा नियम होता. त्यामुळे किमान शेअर भाडे १५ रुपये घेण्याचे ठरले होते. मात्र आजही अनेक रिक्षाचालक चार प्रवासी बसवून प्रती १५ रुपये शेअर भाडे प्रवाशांकडून घेत आहेत. अशा रिक्षाचालकांवर कोणतीही कारवाई होत नाही.

लोकमत पु.पा.१

## मोबाइल चोरीला

मीरा रोड : मीरा रोड पूर्वेस रेल्वेस्थानकलगत शांती शॉपिंग सेंटरमध्ये सनराइज डॉरमेट्री लॉजमधून चार ग्राहकांचे चार मोबाइल चोरीला गेल्याची घटना घडली. मोहम्मद अमीर खान, मुझम्मिल सय्यद, जयराज नागराज व तेजस साता हे चौघे कामनिमित्त आले होते. सदर लॉजमध्ये ते थांबले होते. बुधवारी सकाळी पहिले असता चौघांचे मोबाइल चोरीला गेले होते. लॉजचा व्यवस्थापक किशोर शेट्टी यास जाब विचारला असता त्याने काही माहीत नसल्याचे सांगितले. याप्रकरणी नयानगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

लोकमत पु.पा.१

## दुकान फोडले



मीरा रोड : भाईंदर पूर्वेच्या गोडदेव - फाटक मार्गावर मनीष कॉम्प्लेक्समध्ये हिरल जखोरिया यांचे चष्माच्या सुट्या भागांचे दुकान आहे. दुकानाच्या मागील भागातील लोखंडी जाळी तोडून चोरट्याने १० हजार रोख व ४० किलो पितळी धातूचे २८ हजारांचे चष्म्याचे भाग चोरून नेले होते. याप्रकरणी नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CamScanner

लोकमत पु. पा. न. ३

# मीरा-भाईंदरमध्ये फेरीवाल्यांवर गुन्हा

लोकमत न्यूज नेटवर्क



मीरा रोड : मीरा-भाईंदरमध्ये सार्वजनिक गर्दीच्या ठिकाणी फेरीवाले व हातगाडीवाल्यांनी उच्छाद मांडला आहे. कारवाईची जबाबदारी असणारे पालिकेचे फेरीवाला पथक व अधिकारी काणाडोळा करत असल्याने दुसरीकडे रहदारीला होणारा प्रचंड त्रास पाहून आता पोलिसांनीच हातगाडीवाल्यांवर गुन्हे दाखल करण्यास सुरुवात केली असून चार जणांवर गुन्हे दाखल केले आहेत.

पालिका कारवाई करत नसल्याने आता पोलिसांनीच फेरीवाले-हातगाडी चालकांवर गुन्हा दाखल करण्यास सुरुवात केली आहे. भाईंदर पूर्वेच्या नवघर नाका येथील हनुमान मंदिराजवळ नाल्याचे काम सुरू असताना फेरीवाले हातगाड्या लावून नागरिकांसह वाहनचालकांना वेठीस धरत आहेत. फेरीवाल्यांमुळे वाहन चालवणे अवघड झाले आहे. वरिष्ठ निरीक्षक मिलिंद देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली सूर्यकांत कैंद्रे व सुरक्षा बलाचे मयूर जरे हे गस्तीवर असताना नवघर नाका येथे मनोज गुप्ता, सूरज चौरसिया, वसिष्ठ यादव व सागर साथींम हे फेरीवाले हातगाडी लावून नागरिकांना रहदारीस व वाहतुकीस अडथळा निर्माण करत असताना आढळून आले. कैंद्रे यांच्या फिर्यादीवरून फेरीवाल्यांवर नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत पा. न. ४

# भाईंदरच्या बारवर छापा

मीरा रोड : ऑर्केस्ट्रा बारच्या आड सर्रास बारबालांचा अश्लील नाच सुरूच असून भाईंदर पूर्वेच्या मिड लाईफ बारमधून ग्राहकांसह ११ जणांना पोलिसांनी पकडले. या कारवाईत पोलिसांनी ५८ हजार ६०० रुपयांची रोख जप्त केली आहे. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक शाखेचे पोलिस निरीक्षक समीर अहिरराव यांच्या पथकाने मिळालेल्या माहितीनंतर मिड लाईफ ऑर्केस्ट्रा बारवर छापा टाकला. पोलिसांना ऑर्केस्ट्रा बारमध्ये बारबाला या बंदी असूनदेखील नृत्य करत असल्याची व्हिडीओ क्लिप मिळाली होती. बारमध्ये ७ बारबाला आढळून आल्या. पोलिसांनी बारमधील कर्मचाऱ्यांसह ग्राहकांना पकडले. बुधवारी नवघर पोलिसांनी ११ जणांवर गुन्हा दाखल केला.


लोकमत पा. न. ४

# शिजान ड्रग्स घ्यायचा अन् तुनीषाला उर्दू शिकवायचा

## आईचा गंभीर आरोप : मोलकरीण म्हणते, लग्नाची सुरु होती तयारी

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : अभिनेत्री तुनीषा शर्मा



मृत्यू प्रकरणात आता नवे वळण आले आहे. तुनीषाची आई वनिता शर्मा हिने शिजान खानवर ड्रग्स घेतल्याचा आणि तिला उर्दू शिकवल्याचा गंभीर आरोप केला आहे. तिच्या मोलकरणीने तुनीषाची आईदेखील शिजानच्या घरी ये-जा करत असल्याचे पोलिसांना सांगितल्याचे सूत्रांकडून कळते. दरम्यान, वालीव पोलिसांनी शिजानच्या मैत्रिणीचीही चौकशी केली असून तुनीषाच्या मृत्यूप्रकरणी वालीव पोलिसांनी आतापर्यंत २१ जणांचे जबाब नोंदवले आहेत.

### व्हॉट्सअ‍ॅप चॅट्स शिजानने केले डिलीट

वालीव पोलिसांनी तीन फोन जप्त केले आहेत. यापैकी तुनीषाचा मोबाइल अद्याप अनलॉक झालेला नाही. पोलिसांनी शिजानच्या फोनवरील व्हॉट्सअ‍ॅप चॅट्सवरून अडीचशे ते तीनशे पानांची फाइल तयार केली आहे. तुनीषा आणि शिजान, शिजान आणि तुनीषाची आई यांच्यात चॅट झालेले आहेत. यामध्ये शिजानचे त्याच्या अन्य मैत्रिणीशी झालेल्या चॅटचाही समावेश आहे.

तुनीषाच्या घरी घरकाम करणारी बाई आणि आईच्या दाव्यामुळे नवे वळण आले आहे. तुनीषाच्या आईने शिजान ड्रग्ज घेत असल्याचा आरोप केला आहे. तसेच शिजानला भेटल्यानंतर तुनीषाची जीवनशैली बदलली होती. तिने हिजाब घातला होता आणि शिजान तिला उर्दू शिकवत होता. तिच्या मृत्यूनंतर शिजानने तिला मदत केली नाही. मात्र, तो किती दिवसांपासून ड्रग्ज घेत होता, याची माहिती नसल्याचेही तिने सांगितले आहे. पोलिसांच्या चौकशीत अभिनेत्रीच्या घरी काम करणाऱ्या मोलकरणीने ते दोघे त्यांच्या लग्नाची तयारी करत होते. इतकेच नाही तर तुनीषा आणि शिजान एकमेकांच्या घरी ये-जा करायचे. दोघे ४ ते ६ दिवस एकमेकांच्या घरी राहिले होते. तुनीषाची आई वनिताही शिजान खानच्या घरी जायची, असा दावा केल्याचे पोलिस सूत्रांकडून कळते. पोलिसांनी शिजानच्या मैत्रिणीची केली चौकशी आहे.

वनिता यांनी यापूर्वीही शिजानवर अनेक मुलींशी संबंध असल्याचा आरोप केला आहे. व्हॉट्सअ‍ॅप चॅट्समधून पोलिसांना शिजानच्या गुप्त मैत्रिणीबद्दल माहिती मिळाली. आता पोलिसांनी तिचीही चौकशी केल्याचे कळते. मात्र, ही गर्लफ्रेंड कोण आहे, याबाबत कोणतीही माहिती समोर आलेली नाही. शनिवारी तुनीषाने मेकअप रूममध्ये पंख्याला लटकून आत्महत्या करण्यापूर्वी शिजानने या गुप्त मैत्रिणीशी दोन तास बोलणे केल्याची माहिती पोलिस सूत्रांकडून कळते.

CamScanner

लोकमत पु. पा. न. २

# नववर्ष स्वागत घरी की कोठडीत?

धीरज परब

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा भाईंदर आणि वसई विरारमध्ये थर्टी फर्स्टचा उत्साह मोठा असला तरी पोलिसांच्या नियम - निर्देशांचे पालन करूनच आनंदोत्सव साजरा करावा लागणार आहे. जल्लोषास कोणतेही गालबोट लागू नये याची जबाबदारी पोलिस व नागरिकांवर आहे. शहरातील वने, इकोसेन्सेटिव्ह झोन, कांदळवन व ५० मीटर बफर झोन हे ध्वनिक्षेपक, पार्ट्या वा वनेतर उपक्रमांसाठी प्रतिबंधित आहेत. त्यामुळे या भागातील घडामोडींवर पोलिस, पालिका आणि उत्पादन शुल्क विभागाचे लक्ष आहे. त्यामुळे नववर्षाचे स्वागत घरच्या घरी करायचे की पोलिस कोठडीत हे तुम्हीच ठरवायचे आहे.

## पहाटे पाच वाजेपर्यंत हॉटेल राहणार सुरु

आयुक्तालयाच्या क्षेत्रात पहाटे पाच वाजेपर्यंत बंदिस्त हॉटेल व बार खुले ठेवण्याची परवानगी दिली आहे. परंतु कोणताही अनुचित प्रकार होणार नाही याची जबाबदारी त्या बार, हॉटेलची असणार आहे. मोकळ्या जागेत, वन व इकोसेन्सेटिव्ह क्षेत्र तसेच कांदळवन व सीआरझेड १ क्षेत्र, आदी खुल्या परिसरात पार्ट्या, कार्यक्रम, तसेच ध्वनिक्षेपकांना परवानगी देता येणार नाही.




## पोलिसांकडे केवळ १५ ब्रीथ ॲनालायझर

मीरा भाईंदर - वसई विरार पोलिस आयुक्तालयाची इतकी मोठी हद्द असताना तीन परिमंडळात प्रत्येकी पाच अशी केवळ १५ ब्रीथ ॲनालायझर आहेत. त्यामुळे मद्यपान करून वाहने चालविणाऱ्यांवर वचक ठेवून कारवाई करण्यात पोलिसांना अडचण येते. कोरोना नियमांचे पालन करणे आवश्यक असल्याने ब्रीथ ॲनालायझर प्रत्येक वेळी स्वच्छ करून वापरावे लागणार आहे.

## नववर्षाचे स्वागत करताना ही काळजी घ्या



मद्यपान करून वाहन चालवू नका. सार्वजनिक ठिकाणी-रस्त्यांवर मद्यपान, पार्टी, हुल्लडबाजी करू नका. ध्वनी प्रदूषण नियंत्रण करण्याच्या अनुषंगाने ध्वनी मर्यादेचे पालन करा.

## मदतीसाठी पोलिसांना या नंबरवर करा संपर्क

मीरा भाईंदर पोलिस आयुक्तालयाने नियंत्रण कक्षाचा ११२ हा क्रमांक नागरिकांना मदतीसाठी दिलेला आहे. त्या क्रमांकावर कॉल केल्यानंतर काही मिनिटात पोलिस मदतीसाठी पोहोचतील, असा पोलिसांचा दावा आहे.

## ३१ च्या रात्री दोन हजार पोलिस रस्त्यावर



थर्टी फर्स्टच्या रात्री मीरा भाईंदर आणि वसई विरार शहरात २५० पोलिस अधिकारी, १२०० पोलिस अंमलदार, २५० होमगार्ड व ३०० महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान बंदोबस्तासाठी तैनात असणार आहेत. रस्ते-गल्लीबोळांपासून गणवेशात, तसेच साध्या वेशात पोलिसांची गस्त असणार आहे. रेकॉर्डवरच्या गुन्हेगारांवर पोलिसांचे लक्ष असेल.

> थर्टी फर्स्टचा आनंद साजरा करताना नियमांचे उल्लंघन करू नये. मद्यपी वाहन चालकांच्या तपासणीची मोहीम सुरू केली असून, ती आणखी कडक केली जाईल. ठिकठिकाणी नाकाबंदी केली जाणार आहे. हुल्लडबाजी, गोंधळ, अनुचित प्रकार वा अपघात होणार नाही, याची खबरदारी घ्यावी.
>
> \- श्रीकांत पाठक, अंपर पोलिस आयुक्त, मीरा भाईंदर-वसई विरार पोलिस आयुक्तालय

लोकमत पु. पा. न. ३

# लोखंडी जाळी चोरणाऱ्यास अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** इमारतीच्या आवारातील लोखंडी जाळी चोरणाऱ्या चोराचा रहिवाशांनी स्वतःच सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे शोध घेऊन त्याला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिल्याची घटना भाईंदर पूर्वेला घडली.

भाईंदर पूर्व उड्डाणपुलाजवळ नर्मदा पॅराडाइज इमारत आहे. मंगळवारी इमारतीचा रखवालदार हरी सिंग याने इमारतीचे सचिव राजेश सावंत यांना दूरध्वनी करून इमारतीच्या आतील गटारावरील लोखंडी जाळी चोरीला गेल्याचे कळवले. सावंत यांनी लोखंडी जाळी न दिसल्याने इमारतीतील सीसीटीव्ही पाहिले असता, त्यात एक अनोळखी व्यक्ती लोखंडी जाळी घेऊन जाताना दिसून आला. ते फुटेज व छायाचित्र मोबाईलमध्ये घेऊन सावंत यांनी इमारतीतील रहिवासी जय पटेल यांच्यासह चोरट्याचा आझादनगर-गोल्डन नेस्ट भागात शोध घ्यायला सुरुवात केली.

आझाद नगर बसस्थानकजवळ जाळी चोरून नेणारा व्यक्ती त्यांना दिसताच सावंत व पटेल यांनी त्याला पकडले. जाळीबाबत विचारणा केली असता, ती त्याने भंगार दुकानात विकल्याचे सांगितले. सावंत यांनी नवघर पोलिसांना दूरध्वनी करून जाळी चोर पकडल्याचे कळवल्यानंतर पोलिस घटनास्थळी आले व त्यास पकडून पोलिस ठाण्यात आणले. सावंत यांच्या फिर्यादीवरून आठ हजारांच्या जाळी चोरीप्रकरणी अरमान अलिशान मणियार (वय २५) याच्यावर गुन्हा दाखल करून ताब्यात घेतले.

लोकमत पा. न. ४

# महिलेची गळफास लावून आत्महत्या

**नालासोपारा :** नालासोपारा येथे ४४ वर्षीय महिलेने गळफास लावून आत्महत्येचे टोकाचे पाऊल उचलले आहे. वृंदावन गार्डन येथे राहणाऱ्या कल्पना पटेल (४४) या महिलेने बुधवारी सायंकाळी सातच्या सुमारास कोणत्या तरी कारणावरून बेडरूममध्ये पंख्याला गळफास लावून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतर त्यांना उपचारासाठी येथील रुग्णालयात दाखल केले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. आचोळे पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

लोकमत पा. न. ४

# नशेत विहिरीत बुडून मृत्यू

**नालासोपारा :** विरार येथे दारूच्या नशेत एकाचा विहिरीत बुडून मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. विरारच्या गडगापाडा येथे राहणाऱ्या एकनाथ राठोड (४०) यांचा शेतातील विहिरीत २१ ते २८ डिसेंबरदरम्यान दारूच्या नशेत पडल्याने मृत्यू झाला होता. बुधवारी विरार पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

CS CamScanner

सकाळ पु. पा. न. १

# वाहनचोरांचे पोलिसांना आव्हान

## वर्षभरात ७७५ वाहनांची चोरी; वालीवमध्ये सर्वाधिक घटनांची नोंद

प्रसाद जोशी : सकाळ वृत्तसेवा

वसई, ता. २९ : वसई-विरार, मिरा-भाईंदर पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीतील १६ पोलिस ठाणे परिसरातून वर्षभरात ७७५ वाहने चोरीला गेल्या आहेत. यातील ४२६ वाहनांचा पत्ता लागला नाही. यात सर्वाधिक १२० वाहनचोरीच्या घटना वालीव पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडल्या आहेत. त्यामुळे वाहनचोरांनी पोलिसांना आव्हान दिल्याचे चित्र आहे.

पोलिस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात वाहनचोरीच्या घटनांत वाढ झाली आहे. यात रिक्षा, दुचाकी आणि चारचाकी गाड्यांचे प्रमाण अधिक आहे. वालीव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील १२० वाहने चोरीला गेली आहेत. त्यापैकी ४२ वाहनांचा तपास लागला आहे, तर माणिकपूर परिसरातून ७६ वाहने चोरीला गेली असून ३५ वाहनांचा शोध लागला आहे. महामार्गालगत येणाऱ्या पेल्हार पोलिस ठाण्याच्या क्षेत्रातून ७० वाहनांपैकी एकूण ३८ वाहने बेपत्ता आहेत.

### काय काळजी घ्याल


- दुचाकीचे हॅन्डल लॉक करा
- सार्वजनिक ठिकाण सुरक्षित आहे याची खात्री करा
- वाहने उभी करताना काळजी घ्या.
- चोरी झाल्यावर त्वरित पोलिसांना माहिती द्या.
- गृहसंकुल परिसरात सीसी टीव्ही लावा.

### उत्तन सर्वात सुरक्षित

सर्वाधिक कमी वाहने चोरीला गेल्याच्या घटना उत्तन व वसई गावात घडल्या आहेत. यात उत्तन पोलिस ठाणे परिसरातून चार वाहने चोरीला गेली असून यापैकी तीन वाहनांचा शोध लागला आहे; तर वसई गावातून ११ वाहने चोरीला गेली असून यापैकी तीन वाहनांचा पोलिस शोध घेत आहेत.


चोरी केलेली वाहने अनेकदा दुसऱ्या राज्यात विक्री केली जात असल्याच्या घटना समोर आल्या आहेत.






वाहने पार्क करताना चालकांनी काळजी घ्यावी. ज्या पोलिस ठाण्याच्या हद्दीतून वाहन चोरी होत असेल तिथले पोलिस तपास करून गुन्हा उघडकीस आणतात. यासाठी सीसी टीव्ही महत्त्वाचा ठरत असतो. नागरिकांनी वाहन चोरी झाल्यास त्वरित पोलिसांशी संपर्क साधावा.

**- बलराम पारकर,** जनसंपर्क अधिकारी, आयुक्तालय



सकाळ पु. पा. न. १



# नववर्षाच्या स्वागताला पोलिसांचा पहारा

## १७५० पोलिस, २५० होमगार्ड तैनात

वसई. ता. २९ (बातमीदार) : सरत्या वर्षाला निरोप देत नव्या वर्षाचे जल्लोषात स्वागत केले जाणार आहे. पण नववर्ष साजरे करताना नियमांना बगल दिल्यास कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. यानिमित्त बंदोबस्तासाठी पोलिस आयुक्तालय कार्यक्षेत्रात एक हजार ७५० पोलिस व २५० होमगार्ड तैनात असणार आहेत.

नवीन वर्षाच्या स्वागतासाठी व सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी नागरिक ३१ डिसेंबरला मोठ्या प्रमाणात आनंदोत्सव साजरा केला जातो. पण अनेकदा मद्यपान करून वाहने चालविणे, सार्वजनिक ठिकाणी दंगामस्ती करणे असे प्रकार घडतात. त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडू नये, याकरिता मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयाकडून बंदोबस्त तैनात असणार आहे. यात आयुक्तालयातील काशिमिरा, वसई व विरार या तिन्ही वाहतूक शाखेकडून व पोलिस ठाण्याकडून ठिकठिकाणी नाकाबंदी लावण्यात येणार आहे. तसेच रेकॉर्डवरील गुन्हेगार यांच्यावर पोलिसांची करडी नजर असणार आहे. महत्त्वाच्या ठिकाणी साध्या वेशातील गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार हे देखील पाळत ठेवणार आहे. तसेच अडचणीच्या प्रसंगी गरज भासल्यास तत्काळ मदतीसाठी डायल ११२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

### असा आहे बंदोबस्त

पोलिस आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये पोलिस आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलिस आयुक्त, सर्व पोलिस उपआयुक्त, सर्व सहा पोलिस आयुक्त यांच्या देखरेखीखाली एकूण २५० पोलिस अधिकारी, १२०० पोलिस अंमलदार, २५० होमगार्ड आणि ३०० महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान रात्रभर कडक बंदोबस्तामध्ये तैनात असणार आहे.

### मनाई आदेश लागू

वसई विरार पोलिस आयुक्तालयाचे पोलिस उपायुक्त प्रकाश गायकवाड यांनी महाराष्ट्र पोलिस अधिनियम सन १९५१ चे कलम ३७ पोटकलम (१) व (३) अन्वये कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी मनाई आदेश लागू केला आहे.

लोकसत्ता पु. पा. ४

# बेकायदा फेरीवाल्यांना लवकरच दणका

## पालिकेचे प्रभाग कार्यालयांना आदेश

लोकसत्ता प्रतिनिधी

विरार : वसई-विरार महापालिकेने शहरातील बेकायदा फेरीवाल्यांवर कारवाईची तयारी सुरू केली आहे. पालिका प्रशासनाकडून तसे आदेश प्रभाग समिती कार्यालयांना देण्यात आले आहेत. यामुळे आता शहरातील बेकायदा फेरीवाल्यांना चांगलाच दणका बसणार आहे.

पालिकने नुकतेच पंतप्रधान स्वनिधीतून हजारो फेरीवाल्यांना कर्ज देत फेरीवाल्यांची नोंदणी आणि अहवाल तयार केले. पालिकेने फेरीवाला धोरणाअंर्तगत २०१५ मध्ये शहरातील फेरीवाल्यांचे बायोमेंट्रीक पद्धतीने सर्वेक्षण केले होते. त्यानुसार शहरात १५ हजार ६४६ फेरीवाले पालिकेने नोंदविले होते. मात्र, फेरीवाला धोरणाची अद्याप अंमलबजावणी केलेली नाही.

दुसरीकडे, शहरात बेकायदा फेरीवाल्यांची संख्या वाढत गेली. करोना काळात त्यात मोठ्या प्रमाणावर भर पडली आहे. शहरांतील मुख्य रस्ते, रेल्वे स्थानक परिसर, चौकाचौकांत फेरीवाल्यांनी आपले बस्तान मांडले आहे. यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा होत असल्याने वाहतूक कोंडी होत आहे. त्यात रुग्णवाहिका, अग्निशमन दलाची वाहनेही अडकून पडत आहेत. या कोंडीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

पालिका प्रशासनाने नुकतेच सर्व प्रभाग समिती कार्यालयांना आपल्या प्रभागातील फेरीवाल्यांचे अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. तसेच त्याचे भौगोलिक मूल्यांकन करण्याबरोबरच बेकायदा फेरीवाल्यांवर कारवाईचे आदेश दिले आहेत.

लोकसत्ता पु. पा. ४

# भाईंदरमध्ये झाडांची कत्तल

भाईंदर : मिरा-भाईंदर महापालिकेची परवानगी न घेता परस्पर २८ झाडांची कत्तल करण्यात आल्याचा प्रकार भाईंदरमध्ये घडला आहे. या प्रकरणी जमीन मालकाविरोधात पालिकेने नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

भाईंदर पूर्वेतील आयडीयल पार्क परिसरातील मोकळ्या जागेत मोठ्या प्रमाणात वृक्षतोड सुरू होती. पालिकेचे उद्यान अधीक्षक नागेश वीरकर यांनी प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली. यावेळी २८ झाडाची कत्तल केल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे वीरकर यांनी जागा मालक नंदकुमार पाटील यांना नोटीस बजावली होती. परंतु, नोटिशीला त्यांनी उत्तर न दिल्याने पालिकेने पोलिसात तक्रार दिली.

CamScanner

लोकमत इन्फोग्राफिक्स

# नववर्षाचे स्वागत घरी की पोलिस कोठडीत?



मंगेश कराळे। लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** नव्या वर्षाचे स्वागत करताना उत्साहाच्या भरात काही लोकांकडून मर्यादेचे उल्लंघन होते आणि पोलिसांच्या कारवाईला सामोरे जावे लागते. सरत्या वर्षाला निरोपासह नव्या वर्षाचे स्वागत करताना सर्वांनाच काळजी घ्यावी लागणार आहे. अन्यथा मित्रमंडळी आणि आप्त स्वकियांमध्ये आनंदोत्सव साजरा करण्याऐवजी पोलिस कोठडीत रात्र घालवण्याची वेळ ओढवू शकते. ३१ डिसेंबरच्या रात्री पोलिस आयुक्तालयात दोन हजार पोलिस बंदोबस्तासाठी रस्त्यावर असतील.

## ३१ च्या रात्री हजारो पोलिस रस्त्यावर

मीरा भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये पोलिस आयुक्त मधुकर पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली व अन्य अधिकारी यांच्या देखरेखेखाली एकूण २५० पोलिस अधिकारी, १२०० पोलिस अंमलदार, २५० होमगार्ड व ३०० महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान रात्रभर कडक बंदोबस्तामध्ये तैनात असणार आहेत.

## नववर्षाचे स्वागत करताना काय काळजी घ्याल?

### पार्टी करुन गाडी नको

नवीन वर्षाचे स्वागत उत्साहात करा पण, सर्वांनीच खबरदारी घ्यावी. ड्रंक अँड ड्राइव्ह, उघड्यावरील पार्टीमुळे दुसऱ्यांना त्रास होऊ नये याची काळजी घ्यावी.

### रस्त्यावर पार्टी भोवणार

काही ठिकाणी अतिउत्साही तरुण रस्त्यावर किंवा उघड्यावर पार्टी करतात. कारमधील साउंडचा मोठा आवाज, उघड्यावर मद्यप्राशन, हुल्लडबाजी असे प्रकार घडतात.

### पोलिसांकडे हजार ब्रीथ ॲनालायझर

मद्यप्राशन करणाऱ्या चालकांवर कारवाईसाठी पोलिस आयुक्तालयात तपासणी मोहीम राबवली जाणार आहे. स्थानिक, वाहतूक पोलिसांकडे ब्रेथ ॲनालायझर असणार आहेत.







### मदतीसाठी पोलिसांना या नंबरवर करा संपर्क

प्रसंगी गरज भासल्यास तत्काळ मदतीसाठी डायल ११२ या क्रमांकावर संपर्क साधावा, मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिसांतर्फे आवाहन करण्यात आले आहे.

### पार्टीचा जल्लोष रात्रभर

नववर्षाचे स्वागत करण्यासाठी पहाटे पाचपर्यंत हॉटेल्स आणि बार सुरू ठेवण्याची परवानगी आहे. तसेच मध्यरात्रीनंतर एक वाजेपर्यंत वाइनशॉप सुरू राहणार आहेत.

> नवीन वर्षाच्या स्वागतप्रसंगी नागरिकांनी आनंदोत्सव साजरा करताना कायद्याचे पालन करावे व कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरिता दक्षता घ्यावी. **- मधुकर पांडे**, पोलिस आयुक्त

## वसई-विरार पोलिस सज्ज : यंदा पहाटेपर्यंत होणार सेलिब्रेशन

# ‘थर्टी फर्स्ट’वर करडी नजर

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : नवीन वर्षाच्या स्वागतासाठी व सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी नागरिक ३१ डिसेंबर रोजी मोठ्या प्रमाणात आनंदोत्सव साजरा करीत असतात. दरवर्षी ३१ डिसेंबरच्या रात्री १२ वाजता नवीन वर्षाच्या स्वागतासाठी सामान्य नागरिक व महिलादेखील मोठ्या प्रमाणात घराबाहेर आलेल्या असतात, मात्र काही मद्यपी व्यक्ती अशावेळी मद्यपान करून वाहने चालविणे, सार्वजनिक ठिकाणी दंगामस्ती करणे, अशा प्रकारचे कृत्य करताना आढळून येतात. त्यामुळे कोणतेही अनुचित प्रकार घडू नये याकरिता मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या वतीने मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त लावण्यात येणार असून, ‘थर्टी फर्स्ट’वर पोलिसांची करडी नजर राहणार आहे.

टवाळखोरी करणारे, मद्यपान करून वाहन चालविणारे तसेच बेदरकारपणे वाहन चालविणाऱ्या बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करण्यासाठी आयुक्तालयातील काशिमिरा, वसई व विरार या तीनही वाहतूक शाखेकडून व पोलिस ठाण्यांकडून ठिकठिकाणी नाकाबंदी लावण्यात येणार आहे. ब्रेथ ॲनालायझरद्वारे तपासणी करीत कारवाई होणार आहे. रेकॉर्डवरील गुन्हेगार यांच्यावर पोलिसांची करडी नजर राहून महत्त्वाच्या ठिकाणी साध्या वेशातील गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार संशयितांवर पाळत ठेवणार आहेत. यावेळी महाराष्ट्र शासनाने रोज सकाळी ५ वाजेपावेतो उपाहारगृहे व बार चालविण्यास मुभा दिलेली आहे. त्याचप्रमाणे आस्थापनाधारकाने पुरेश प्रमाणात खासगी सुरक्षारक्षक तैना करावयाचे असून, सदर ठिकाणं कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, याबाबत दक्षत घ्यावी लागणार आहे.



वसई-विरार भागांत अनुचित घटना घडू नये यासाठी मोठा बंदोबस्त ठेवला जाणार आहे.

### कायद्याचे पालन करा, अडचणीत ११२ डायल करा!

- नवीन वर्षाच्या स्वागताप्रसंगी नागरिकांनी आनंदोत्सव साजरा करताना कायद्याचे पालन करावे व कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरिता दक्षता घ्यावी.
- तसेच अडचणीच्या प्रसंगी गरज भासल्यास तत्काळ मदतीसाठी डायल ११२ क्रमांकावर संपर्क साधावा, याबाबत मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिसांचे वतीने आवाहन करण्यात आले आहे.

### फौजफाटा केला तैनात

मीरा-भाईंदर, वसई-विरा पोलिस आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये पोलिस आयुक्त मधुकर पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली व अपर पोलिस आयुक्त, सर्व पोलिस उपआयुक्त, सर्व सहायक पोलिस आयुक्त यांच्या देखरेखीखाली एकूण २५० पोलिस अधिकारी, १२०० पोलिस अंमलदार २५० होमगार्ड व ३०० महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान रात्रभर कडक बंदोबस्तामध्ये तैनात असणार आहेत.

Hello Vasai
Page No. 1 Dec 30, 2022
Powered by: erelego.com


लोकमत

# शिजान ड्रग्स घ्यायचा अन् तुनीषाला उर्दू शिकवायचा

## आईचा गंभीर आरोप : मोलकरीण म्हणते, लग्नाची सुरु होती तयार

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** अभिनेत्री तुनीषा शर्मा



मृत्यू प्रकरणात आता नवे वळण आले आहे. तुनीषाची आई वनिता शर्मा हिने शिजान खानवर ड्रग्स घेतल्याचा आणि तिला उर्दू शिकवल्याचा गंभीर आरोप केला आहे. तिच्या मोलकरणीने तुनीषाची आईदेखील शिजानच्या घरी ये-जा करत असल्याचे पोलिसांना सांगितल्याचे सूत्रांकडून कळते. दरम्यान, वालीव पोलिसांनी शिजानच्या मैत्रिणीचीही चौकशी केली असून तुनीषाच्या मृत्यूप्रकरणी वालीव पोलिसांनी आतापर्यंत २१ जणांचे जबाब नोंदवले आहेत.

तुनीषाच्या घरी घरकाम करणारी बाई आणि आईच्या दाव्यामुळे नवे वळण आले आहे. तुनीषाच्या आईने शिजान ड्रग्ज घेत असल्याचा आरोप केला आहे. तसेच शिजानला भेटल्यानंतर तुनीषाची जीवनशैली बदलली होती. तिने हिजाब घातला होता आणि शिजान तिला उर्दू शिकवत होता. तिच्या मृत्यूनंतर शिजानने तिला मदत केली नाही. मात्र, तो किती दिवसांपासून ड्रग्ज घेत होता, याची माहिती नसल्याचेही तिने सांगितले आहे. पोलिसांच्या चौकशीत अभिनेत्रीच्या घरी काम करणाऱ्या मोलकरणीने ते दोघे त्यांच्या लग्नाची तयारी करत होते. इतकेच नाही तर तुनीषा आणि शिजान एकमेकांच्या घरी ये-जा करायचे. दोघे ४ ते ६ दिवस एकमेकांच्या घरी राहिले होते. तुनीषाची आई वनिताही शिजान खानच्या घरी जायची, असा दावा केल्याचे पोलि सूत्रांकडून कळते. पोलिसां शिजानच्या मैत्रिणीची केली चौक आहे.

वनिता यांनी यापूर्वीही शिजान अनेक मुलींशी संबंध असल्या आरोप केला आहे. व्हॉट्सअ चॅट्समधून पोलिसांना शिजानच्या गु मैत्रिणीबद्दल माहिती मिळाली. आ पोलिसांनी तिचीही चौकशी केल्य कळते. मात्र, ही गर्लफ्रेंड कोण अ याबाबत कोणतीही माहिती सम आलेली नाही. शनिवारी तुनीष मेकअप रूममध्ये पंख्याला लटक आत्महत्या करण्यापूर्वी शिजानने गुप्त मैत्रिणीशी दोन तास बोल केल्याची माहिती पोलिस सूत्रांक कळते.

### व्हॉट्सअॅप चॅट्स शिजानने केले डिलीट

वालीव पोलिसांनी तीन फोन जप्त केले आहेत. यापैकी तुनीषाचा मोबाइल अद्याप अनलॉक झालेला नाही. पोलिसांनी शिजानच्या फोनवरील व्हॉट्सअॅप चॅट्सवरून अडीचशे ते तीनशे पानांची फाइल तयार केली आहे. तुनीषा आणि शिजान, शिजान आणि तुनीषाची आई यांच्यात चॅट झालेले आहेत. यामध्ये शिजानचे त्याच्या अन्य मैत्रिणीशी झालेल्या चॅटचाही समावेश आहे.

Mumbai Main
Page No. 4 Dec 30, 2022
Powered by: erelego.com



गणेश पाटील
प्र.सहआयुक्त

आठवडाभरासाठी डी विभागाचा प्रभार हाती घेतलेल्या गणेश पाटील यांनी प्र.सहआयुक्त विशाखा मोटघरे यांनी केलेली पापे धुण्याचे काम सुरू केले आहे

# प्र.सहआयुक्त गणेश पाटील यांनी आचोळे विभागात पाय ठेवताच भुमाफियांचे बेकायदा बांधकामांचे बुरुज ढासळले

## प्र.सहआयुक्त गणेश पाटील पुढील आठवडाभरात आणखी बेकायदा बांधकामं निष्कासित करणार





वसई,(प्रतिनिधी) : वसई-विरार शहर महापालिकेच्या आचोळे विभागाच्या प्र.सहआयुक्त विशाखा मोटघरे या काही दिवसांसाठी रजेवर गेल्याने त्यांच्या जागी चंदनसार विभागाचे प्र.सहआयुक्त गणेश पाटील यांनी आठवडाभरासाठी पदभार स्विकारला आहे. त्यांनी या विभागाच्या कार्यालयात पाऊल ठेवताच अनधिकृत बांधकामांवर कारवाया सुरू केल्या आहेत. विशाखा मोटघरे यांच्या कार्यकाळात भूमाफियांनी केलेली अनधिकृत घाण व स्वत: विशाखा मोटघरे यांनी भूमाफियांना अनधिकृत बांधकामं करण्यासाठी दिलेली मुभा ही त्यांची पापं धुवून काढण्याची जबाबदारी प्र.सहआयुक्त गणेश पाटील यांनी खांद्यावर घेतली आहेत. त्यांनी आचोळे विभागाचा पदभार स्विकारल्यानंतर आचोळे विभागातील राम-रहीम नगर परिसरातील अनधिकृत चाळींवर हातोडा उगारला. प्रभाग समिती ड विभागाच्या प्र. सहआयुक्त विशाखा मोटघरे यांच्या कार्यकाळात आचोळे (ड) विभागाला अनधिकृत बांधकामांची बाधा झाली आहे. त्या काही काळ रजेवर गेल्यानंतर त्यांच्या जागी प्रभारी अधिकारी म्हणून आलेले गणेश पाटील यांनी ड विभागातील अनधिकृत बांधकामांवर बुलडोझर फिरवण्यास घेतला आहे.

यापुढेही संबंधित विभागात अनधिकृत बांधकामं दिसल्यास ती जागच्या जागी निष्कासित करणार असा फतवाच प्र.सहआयुक्त गणेश पाटील यांनी काढला आहे. जी अनधिकृत बांधकामं प्र.सहआयुक्त गणेश पाटील हे निष्कासित करण्याची हिंमत दाखवू शकतात मग प्र.सहआयुक्त विशाखा मोटघरे का नाही दाखवू शकत? याचा अर्थ अनधिकृत बांधकामांवर वरदहस्त ठेवणार्या मोटघरेंचा भ्रष्टाचार उघड आहे. दरम्यान, गणेश पाटील यांनी अनधिकृत बांधकामांना अल्टीमेटम दिला आहे.

# 'थर्टी फर्स्ट जल्लोष' पोलीस बंदोबस्तासाठी सज्ज







वसई,(प्रतिनिधी) : नवीन वर्षाच्या स्वागतासाठी व सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी नागरिक ३१ डिसेंबर रोजी मोठ्या प्रमाणात आनंदोत्सव साजरा करण्यासाठी बाहेर पडतील. अशावेळी कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांची कसोटी लागणार आहे. कोरोना काळात हा नववर्ष जल्लोष पूर्णत: थांबला होता. त्यामुळे मागील दोन वर्षात नवीन पोलीस आयुक्तालयाला निर्बंधयुक्त वातावरणात नागरिकांना जल्लोष साजरा करावा लागला होता. यावर्षी हा जल्लोष तुफानी असल्यामुळे पोलीस आयुक्तालयाला मोठा बंदोबस्त जल्लोषावर देखरेख ठेवण्याकरिता तैनात ठेवावा लागणार आहे. त्याच धर्तीवर आता ३१ डिसेंबरसाठी मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस सज्ज झाले आहेत. या बंदोबस्तावेळी टवाळखोरी करणारे, मद्यपान करून वाहन चालविणारे तसेच बेदरकारपणे वा चालवणार्या व बेशिस्त वाहन चालकांवर कारवाई करण्यासाठी आयुक्तालयातील काशिमिरा, वसई-विरार या तिन्ही वाहतूक शाखेकडून व पोलीस ठाणे यांच्याकडुन ठिकठिकाणी नाकाबंदी लावण्यात येणार असून ब्रीथ ॲनालाइझद्वारे तपासणी करून कारवाई करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे रेकॉर्डवरील गुन्हेगार यांच्यावर पोलिसांची करडी नजर राहून महत्वाच्या ठिकाणी साध्या वेशातील गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार हे देखील संशयितांवर पाळत ठेवणार आहेत. यावेळी महाराष्ट्र शासनाने सदरदिवशी सकाळी ५ वाजेपर्यंतो उपहारगृहे व बार चालविण्यास मुभा दिलेली आहे. त्याचप्रमाणे आस्थापनाधारकाने पुरेशा प्रमाणात खाजगी सुरक्षारक्षक तैनात करावयाचे असून सदर ठिकाणी कोणताही कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये पोलीस आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली व अपर पोलीस आयुक्त, सर्व पोलीस उपायुक्त, सर्व सहा पोलीस आयुक्त यांच्या देखरेखीखाली एकूण २५० पोलीस अधिकारी, १२०० पोलीस अंमलदार, २५० होमगार्ड व ३०० महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान रात्रभर कडक बंदोबस्त तैनात असणार आहे. नवीन वर्षाच्या स्वागतप्रसंगी नागरिकांनी आनंदोत्सव साजरा करतांना कायद्याचे पालन करावे व कोणताही अनुचित प्रकार घडु नये याकरिता दक्षता घ्यावी. तसेच अडचणीच्या प्रसंगी गरज भासल्यास तात्काळ मदतीसाठी डायल ११२ या क्रमांकावर संपर्क साधावा याबाबत मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिसांच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे.

उम्मीद है कि मेरी जीत से महिलाएं



दैनिक
# हिन्द सागर

अर्शदीप साल के उभरते हुए



ठाणे, वर्ष 2, अंक 138, पृष्ठ -6 शुक्रवार, दिनांकः 30 दिसंबर 2022 Web : www.hindsagar.com मूल्य : 4/-

# ट्रैफिक मार्शल पर जानलेवा हमला करने वाले 6 आरोपी गिरफ्तार



**हिन्द सागर, मीरा भाईंदरः** भाईंदर पूर्व की नवघर पुलिस ने एक निजी कंपनी के ट्रैफिक मार्शल पर जानलेवा हमला करने वाले 6 आरोपियों को गिरफ्तार किया है। गिरफ्तार आरोपियों के नाम हरिओम लालमनि घिवर, मोनू राजेंद्र प्रसाद अंबेडकर, निखिल राम सजन गुप्ता, कृष्णा वीरेंद्र कनौजिया, अमित मंगला प्रसाद सोनी और अखिलेश अजय यादव है। सभी आरोपी भायंदर पश्चिम स्थित शिवसेना गली परिसर में रहते हैं। मीरा भायंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय द्वारा जारी प्रेस विज्ञप्ति के अनुसार 24 दिसंबर को कांदिवली के शताब्दी अस्पताल से नवघर पुलिस स्टेशन में फोन आया कि एक निजी कंस्ट्रक्शन कंपनी में ट्रैफिक मार्शल के रूप में कार्यरत जावेद नियाज अहमद खान (उम्र 27 वर्ष) को जख्मी हालत में अस्पताल में भर्ती कराया गया है। उसके साथ उसके मित्र जाफर जावेद खान को भी भर्ती कराया गया है। जावेद नियाज खान की शिकायत के अनुसार 24 दिसंबर को सुबह 4 बजे मैकडॉनल्ड होटल के पास ड्यूटी करते समय 6 से 7 अज्ञात लोगों ने मामूली कहासुनी के बाद उसके ऊपर चाकू से तीन बार हमला करके उसे बुरी तरह से घायल कर दिया। उन्होंने जावेद के दोस्त जफर पर भी हमला करके उसे घायल कर दिया। परीमंडल क्रमांक 1 के पुलिस उपायुक्त जयंत बजबले तथा सहायक पुलिस आयुक्त डॉ शशिकांत भोसले के मार्गदर्शन और नवघर पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिस निरीक्षक मिलिंद देसाई के निर्देशन में पुलिस निरीक्षक प्रकाश मासाल, सहायक पुलिस निरीक्षक योगेश काले, सहायक पुलिस निरीक्षक हनमंत पडलकर, पुलिस उप निरीक्षक अभिजीत लांडे, पुलिस हवलदार भूषण पाटील, गणेश जावले, सुरेश चव्हाण, नवनाथ घुगे, जयप्रकाश जाधव, वंसोडे, ओंकार यादव, सूरत सिंह घुनावत ,विनोद जाधव की टीम ने आरोपियों को धर दबोचा।

9 राज्य, 18 संस्करण मुंबई, पुणे, जबलपुर, ग्वालियर, नई दिल्ली, इंदौर, भोपाल, सागर, उज्जैन, रतलाम, रायपुर, बिलासपुर, दुर्ग, जयपुर,लखनऊ, जालंधर, रांची, कोलकाता से एक साथ प्रकाशित | मूल्य ₹ 5.00

**सुविचार**

मैं कर सकता हूं, यह विश्वास है। केवल मैं ही कर सकता हूं, यह अंधविश्वास है।

दैनिक दबंग दुनिया

मुंबई, शुक्रवार, 30 दिसंबर 2022

निष्पक्ष नजर, निष्पक्ष खबर

देश का सबसे चर्चित संपूर्ण हिन्दी अखबार

अंदर पढ़ें

पेज 08

# मीरा-भाईदर, वसई-विरार पुलिस 31 दिसंबर के लिए तैयार

**दबंग रिपोर्टर » वसई**

नए साल का स्वागत करने व 2022 को अलविदा कहने के लिए शहरवासी 31 दिसंबर को बड़े पैमाने पर जश्न मनाते हैं। इस दिन रात 00:00 बजे आम नागरिक और महिलाएं भी नए साल का स्वागत करने के लिए बड़ी संख्या में अपने घरों से बाहर निकलती हैं। हालांकि, कुछ शराबी व्यक्ति शराब पीकर गाड़ी चलाने, सार्वजनिक स्थानों पर हंगामा करने जैसी हरकतें करते पाए जाते हैं, इसलिए, किसी भी अप्रिय घटना को होने से रोकने के लिए मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय की ओर से एक बड़ी पुलिस बल तैनात किया जाएगा और शराब पीकर वाहन चलाने वालों, लापरवाह ड्राइविंग और अनियंत्रित चालकों के खिलाफ कार्रवाई की जाएगी।

काशीमीरा, वसई और विरार विभिन्न स्थानों पर यातायात विभाग और थाने की ओर से नाकाबंदी की जाएगी। वहीं बीथ एनालाइजर से निरीक्षण कर कार्रवाई की जाएगी। इसी तरह पुलिस अपराधियों पर ऑन रिकॉर्ड पैनी नजर रखेगी व क्राइम ब्रांच के अधिकारी व कर्मचारी भी महत्वपूर्ण जगहों पर संदिग्धों पर पैनी नजर रखेंगे, इस समय, महाराष्ट्र सरकार ने रेस्तरां और बार को उक्त दिन सुबह 5 बजे से संचालित करने की अनुमति दी है।




नव वर्ष का जश्न मनाते समय नागरिकों को कानून का पालन करना चाहिए और किसी भी अप्रिय घटना से बचने के लिए सावधानी बरतनी चाहिए। साथ ही मीरा-भायंदर, वसई-विरार पुलिस की ओर से भी अपील की जा रही है कि किसी भी तरह की परेशानी होने पर तत्काल मदद के लिए डायल 112 पर संपर्क करें.
मीरा-भायंदर, वसई-विरार पुलिस पुलिस आयुक्तालय

इसी प्रकार, प्रतिष्ठान के मालिक को पर्याप्त संख्या में निजी सुरक्षा गार्ड तैनात करने चाहिए और यह सुनिश्चित करना चाहिए कि उक्त स्थान पर कानून व्यवस्था की कोई समस्या उत्पन्न न हो।मीरा-भाईंदर में, वसई-विरार पुलिस आयुक्तालय के पुलिस आयुक्त के निर्देशन में एवं अपर पुलिस आयुक्त की देखरेख में सभी पुलिस उपायुक्त, सभी सहायक पुलिस आयुक्त के नेतृत्व में कुल 250 पुलिस अधिकारी,1200 पुलिस कर्मचारी,250 होमगार्ड व 300 महाराष्ट्र सुरक्षा बल जवान रात भर कड़क बंदोबस्त में तैनात किया जाएगा।

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष: 26 अंक-196 मुंबई, शुक्रवार 30 दिसंबर 2022 पृष्ठ-12 मूल्य :2.00

# नए साल का स्वागत व 2022 को अलविदा हेतु एमबीवीवी पुलिस सुरक्षा चाक-चौबंद

## किसी भी तरह की परेशानी होने पर तत्काल मदद के लिए डायल 112 पर संपर्क करें

**मुकेश त्रिपाठी**

**वसई :** नए साल का स्वागत करने व 2022 को अलविदा कहने के लिए शहरवासी 31 दिसंबर को बड़े पैमाने पर जश्न मनाते हैं।इस दिन रात 00:00 बजे आम नागरिक और महिलाएं भी नए साल का स्वागत करने के लिए बड़ी संख्या में अपने घरों से बाहर निकलती हैं।हालांकि, कुछ शराबी व्यक्ति शराब पीकर गाड़ी चलाने, सार्वजनिक स्थानों पर हंगामा करने जैसी हरकतें करते पाए जाते हैं,इसलिए, किसी भी अप्रिय घटना को होने से रोकने के लिए मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय की ओर से एक बड़ी पुलिस बल तैनात किया जाएगा और शराब पीकर वाहन चलाने वालों, लापरवाह ड्राइविंग और अनियंत्रित चालकों के खिलाफ कार्रवाई की जाएगी। काशीमीरा, वसई और विरार विभिन्न स्थानों पर यातायात विभाग और थाने की ओर से नाकाबंदी की जाएगी।वहीं बीथ एनालाइजर से निरीक्षण कर कार्रवाई की जाएगी।इसी तरह पुलिस अपराधियों पर ऑन रिकॉर्ड पैनी नजर रखेगी व क्राइम ब्रांच के अधिकारी व कर्मचारी भी महत्वपूर्ण जगहों पर संदिग्धों पर पैनी नजर रखेंगे, इस समय, महाराष्ट्र सरकार ने रेस्तरां और बार को उक्त दिन सुबह 5 बजे से संचालित करने की अनुमति दी है। इसी प्रकार, प्रतिष्ठान के मालिक को पर्याप्त संख्या में निजी सुरक्षा गार्ड तैनात करने चाहिए और यह सुनिश्चित करना चाहिए कि उक्त



स्थान पर कानून व्यवस्था की कोई समस्या उत्पन्न न हो।मीरा-भाईंदर में, वसई-विरार पुलिस आयुक्तालय के पुलिस आयुक्त के निर्देशन में एवं अपर पुलिस आयुक्त की देखरेख में सभी पुलिस उपायुक्त, सभी सहायक पुलिस आयुक्त के नेतृत्व में कुल 250 पुलिस अधिकारी,1200 पुलिस कर्मचारी,250 होमगार्ड व 300 महाराष्ट्र सुरक्षा बल जवान रात भर कड़क बंदोबस्त में तैनात किया जाएगा,वही नव वर्ष का जश्न मनाते समय नागरिकों को कानून का पालन करना चाहिए और किसी भी अप्रिय घटना से बचने के लिए सावधानी बरतनी चाहिए। साथ ही मीरा-भायंदर, वसई-विरार पुलिस की ओर से भी अपील की जा रही है कि किसी भी तरह की परेशानी होने पर तत्काल मदद के लिए डायल 112 पर संपर्क करें.

# पश्चिम रेलवे एवं मध्य रेल के महाप्रबंध के पश्चिम रेलवे के वॉल कैलेंडर क

**मुंबई:** पश्चिम रेलवे और मध्य रेल के महाप्रबंधक अशोक कुमार मिश्र ने मुख्य जनसंपर्क अधिकारी श्री सुमित ठाकुर के साथ पश्चिम रेलवे के सभी प्रमुख विभागाध्यक्षों और वरिष्ठ अधिकारियों की उपस्थिति में मुख्यालय में पश्चिम रेलवे के वॉल कैलेंडर का विमोचन किया जबकि सभी छह मंडलों के मंडल रेल प्रबन्धक वीडियो कांफ्रेंसिंग के जरिए मौजूद रहे। पश्चिम रेलवे का वॉल कैलेंडर-2023 भारत की जी20 प्रेसीडेंसी की थीम और कलर स्कीम पर आधारित है। यह कैलेंडर पश्चिम रेलवे की जीवंतता को प्रदर्शित करता है, जिसके साथ यह अपने सम्माननीय यात्रियों को बेहतर रेल यात्रा अनुभव



DIGITAL
मुंबई, शुक्रवार, 30 दिसंबर 2022

प्रवासी संदेश

PRAVASI SANDESH
www.pravasisandesh.news

9004746488 pravasisandesh1@gmail.com www.facebook/ pravasisandesh1/

# 31 के लिए मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस, व्यवस्था चाक-चौबंद

## नागरिक करें कानून का पालन, अप्रिय घटना से बचें, सावधान रहें

## अपराधियों, शराबियों-जेबकतरों पर विशेष नजर

**प्रवासी संदेश टीम।**

**वसई।** नए साल का स्वागत करने और नए साल को अलविदा कहने के लिए शहरवासी 31 दिसंबर को बड़े पैमाने पर जश्न मनाते हैं। इस दिन रात्रि 12:00 बजे आम नागरिक एवं महिलाएं भी नव वर्ष का स्वागत करने के लिए बड़ी संख्या में घरों से बाहर निकलती हैं। हालांकि, कुछ शराबी व्यक्ति शराब पीकर गाड़ी चलाने, सार्वजनिक स्थानों पर हंगामा करने जैसी हरकतें करते पाए जाते हैं। इसलिए, किसी भी अप्रिय घटना को होने से रोकने के लिए मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय की ओर से एक बड़ी पुलिस बल तैनात किया जाएगा। इसी के साथ जेबकतरों, शराब पीकर वाहन चलाने वालों, लापरवाह ड्राइविंग और अनियंत्रित चालकों के खिलाफ कार्रवाई की जाएगी।





### महत्वपूर्ण जगहों पर पैनी नजर

आयुक्तालय अंतर्गत काशीमीरा, वसई और विरार के यातायात विभाग और थाने द्वारा नाकाबंदी की जाएगी और ब्रेथ एनालाइजर से जांच कर कार्रवाई की जाएगी। इसी तरह सादी वर्दी में क्राइम ब्रांच के अधिकारी व कर्मचारी भी रिकार्ड पर अपराधियों पर पैनी नजर रखकर महत्वपूर्ण जगहों पर संदिग्धों पर पैनी नजर रखेंगे.

### निजी सुरक्षा गार्ड रखें मालिक

इस समय, महाराष्ट्र सरकार ने रेस्तरां और बार को उक्त दिन सुबह 5 बजे तक संचालित करने की अनुमति दी है। इसी प्रकार, प्रतिष्ठान के मालिक को पर्याप्त संख्या में निजी सुरक्षा गार्ड तैनात करने चाहिए और यह सुनिश्चित करना चाहिए कि उक्त स्थान पर कानून व्यवस्था की कोई समस्या उत्पन्न न हो।

### इतने पुलिस अधिकारी-कर्मचारी तैयार

मीरा-भाईंदर में, वसई-विरार पुलिस आयुक्तालय क्षेत्राधिकार में कुल 250 पुलिस अधिकारी, 1200 पुलिस कर्मचारी, 250 होमगार्ड और 300 महाराष्ट्र सुरक्षा बल के जवानों को पुलिस आयुक्त आईपीएस मधुकर पाण्डेय के मार्गदर्शन में और अतिरिक्त पुलिस आयुक्त की देखरेख में पूरी रात कड़ी सुरक्षा में तैनात किया जाएगा।

### डायल करें 112

नव वर्ष का जश्न मनाते समय नागरिकों को कानून का पालन करना चाहिए और किसी भी अप्रिय घटना से बचने के लिए सावधानी बरतनी चाहिए। साथ ही मीरा-भायंदर, वसई-विरार पुलिस की ओर से भी अपील की जा रही है कि किसी भी तरह की परेशानी होने पर तत्काल मदद के लिए डायल 112 पर संपर्क करें.

दैनिक समाचार पत्र | लखनऊ, कानपुर, उन्नाव, झाँसी, मथुरा व प्रयागराज से प्रसारित | RNI NO - UPHIN2007/22822

खबर सिर्फ जनहित के लिए

# पब्लिक पॉवर

सूर्या न्यूज़ 24
आपकी बुलन्द आवाज़

लखनऊ,शुक्रवार,30,दिसम्बर,2022, वर्ष 06, अंक :100 पृष्ठ :08, मूल्य 2रू/-

## 31 दिसंबर को एमबीबीवी पुलिस का कड़क बंदोबस्त

मुंबई पवन पंडित

भाईदर ; नए साल का स्वागत करने व 2022 को अलविदा कहने के लिए शहरवासी 31 दिसंबर को बड़े पैमाने पर जश्न मनाते हैं।इस दिन रात 00रू00 बजे आम नागरिक और महिलाएं भी नए साल का स्वागत करने के लिए बड़ी संख्या में अपने घरों से बाहर निकलती हैं।हालांकि, कुछ शराबी व्यक्ति शराब पीकर गाड़ी चलाने, सार्वजनिक स्थानों पर हंगामा करने जैसी हरकतें करते पाए जाते हैं,इसलिए, किसी भी अप्रिय घटना को होने से रोकने के लिए मीरा–भाईदर, वसई–विरार पुलिस आयुक्तालय की ओर से एक बड़ी पुलिस बल तैनात किया जाएगा और शराब पीकर वाहन चलाने वालों, लापरवाह ड्राइविंग और अनियंत्रित चालकों के खिलाफ कार्रवाई की जाएगी। काशीमीरा, वसई और विरार विभिन्न स्थानों पर यातायात विभाग और थाने की ओर से नाकाबंदी की जाएगी।वहीं बीथ एनालाइजर से निरीक्षण कर कार्रवाई की जाएगी।इसी तरह पुलिस अपराधियों पर ऑन रिकॉर्ड पैनी नजर रखेगी व क्राइम ब्रांच के अधिकारी व कर्मचारी भी महत्वपूर्ण जगहों पर संदिग्धों पर पैनी नजर रखेंगे, इस समय, महाराष्ट्र सरकार ने रेस्तरां और बार को उक्त दिन सुबह 5 बजे से संचालित करने की अनुमति दी है। इसी प्रकार, प्रतिष्ठान के मालिक को पर्याप्त संख्या में निजी सुरक्षा गार्ड तैनात करने चाहिए और यह सुनिश्चित करना चाहिए कि उक्त स्थान पर कानून व्यवस्था की कोई समस्या उत्पन्न न हो।मीरा–भाईदर में, वसई–विरार पुलिस आयुक्तालय के पुलिस आयुक्त के निर्देशन में एवं अपर पुलिस आयुक्त की देखरेख में सभी पुलिस उपायुक्त, सभी सहायक पुलिस आयुक्त के नेतृत्व में कुल 250 पुलिस अधिकारी, 1200 पुलिस कर्मचारी,250 होमगार्ड व 300 महाराष्ट्र सुरक्षा बल जवान रात भर कड़क बंदोबस्त में तैनात किया जाएगा,वही नव वर्ष का जश्न मनाते समय नागरिकों को कानून का पालन करना चाहिए और किसी भी अप्रिय घटना से बचने के लिए सावधानी बरतनी चाहिए। साथ ही मीरा–भायंदर, वसई–विरार पुलिस की ओर से भी अपील की जा रही है कि किसी भी तरह की परेशानी होने पर तत्काल मदद के लिए डायल 112 पर संपर्क करें.

## आयुक्त व अतिरिक्त आयुक्त ने भार्गवी संखे को सम्मानित किया

मुंबई पवन पंडित



वसई ; एशियाई किकबॉक्सिंग चौंपियनशिप में स्वर्ण पदक जीतने वाली वसई की भार्गवी संखे को वसई विरार शहर महानगरपालिका आयुक्त अनिल कुमार पवार और अतिरिक्त आयुक्त अजिक्य बागड़े ने गुरुवार (29 दिसंबर ) को सम्मानित किया,आयुक्त पवार ने उनके भविष्य के प्रयासों के लिए उन्हें शुभकामनाएं दीं,वही विविसीएमसी कला क्रीड़ा विभाग से जानकारी मिली है कि 26 जनवरी को महानगरपालिका पुरस्कार व सत्कार करेगी।लिहाजा,संखे द्वारा स्वर्ण पदक जीतने से वसई तालुका ही नहीं पूरा देश का नाम रौशन हुआ है।